PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 2, ISSUE 2

# ग. दि. माडगुळकरांची ‘ग्रामीण कथा’

**प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने**
स्वं. नि. पा. वाघाये कला. महा. एकोडी
ता. साकोली जि.भंडारा

ग. दि. माडगूळरांनी कविता कादंबरी, ललित, गघ्य लेखनाबरोबरच अनेक कथासुद्धा लिहिल्या आहेत. इ.स. १९५२ ते इ.स. १९६३ पर्यंत ‘बोलका शंख’ कृष्णाची करंगळी’ ‘बांधावरच्या बाभळी’ चंदनी उदबत्ती, ‘भाताचे फुल’ सोने आणी माती, असे एकूण आठ कथासंग्रह प्रसिद्व झाले आहेत. आठही कथासंग्रहात एकूण नव्वद कथांचा समावेश आहे. यात ग्रामीण, नागरी कथांबरोबरच निसर्ग कथा, प्रेमकथा, विनोदी कथा , चमत्कृती परकथा दृष्टिस पडतात . तातल्या त्यात गदिमांची ग्रामिण कथानकावर आधारित, ग्रामिण व्यक्तीची सुखदु:खे व्यक्त करणारी कथा विशेष लक्ष वेधी आहे.

**ग्रामिण कथा आणि कथाकार :**

विशिष्ट भुप्रदेशातील ग्रामीण वातावरण, तिथला निसंर्ग , तिथल्या ग्रामीण व्यक्ती . त्या व्यक्तींची सुखदु:खे , घटना , प्रसंग , परिसर यांचे ग्रामीण शब्द आणि ग्रामीण बोलींचे दर्शन ग्रामीण कथेतुन घडते. ह.ना. आपटे, ग.ल. ठोकळ, श्री म. माटे,र.वा दिघे, व्यंकटेश माडंगुळकर, ग.दी. माडगुळकर, द.मा. मिरासदार ,अण्णा भाऊ साठे, शंकर पाटील , आनंद यादव, रा.र बोराडे उद्वव ज. शेळके , चारूता सागर , श्री. ना. पेंडसे या मराठी कथाकारांनी ग्रामीन कथा विशेष समुद्व केली आहे.

**गदिमांच्या कथासंग्रहातील ग्रामीण कथा :–**

गदिमांचा ‘ लपलेला ओघ ’ हया कथासंग्रहात ‘ विज ’ ‘ मावशी परत आल्या पण’ ‘ मुके प्रेम , सघा हेकणे’ हया ग्रामीण कथा आहेत. ‘ वेग आणी इतर कथा

’ या कथासंग्रहात ‘वय’ आसक्ती ‘शेवटचा दिवस गोड व्हावा ’ ‘वसुली’ गौडबंगाल हया कथांचा उल्लेख ग्राणीण कथा म्हणुन करता येईल ‘ बोलका शंख’ हया कथा संग्रहात ‘ निर्वाण’, मत्रांचे पत्र या दोन ग्रामिण कथा आहेत . ‘कृष्णाची करंगळी’ हया कथासंग्रहात ‘कृष्णाची करंगळी ‘ रामाबालिष्टर ’ माणुस आखेर माणुस आहे. ‘ सोनपितळ’. हया ग्रामीण कथा आहेत . ‘ बांधावरच्या बाभळी हया कथा संग्रहात ‘ बांधावरच्या बाभळी’ तांबळी आजी’ ‘दृष्टी’

‘कहाणी गटटसोडयांची’ ‘सजा’, ‘ पांढरीचा भेंडा’ अशा ग्रामीण कथा आहेत . ‘चंदनी उद्बबती ’ हया कथा संगहात ‘ भुक ’ आणी द्वारका’ अशा दोन ग्रामीण कथा आहेत. ‘ सोने आणी माती’ कथा संग्रहात ‘ सोनें आणि माती ’ व ‘ हया कानापासुन त्या कानापर्यंत ’ अशा दोन ग्रामीण कथा आहेत. एकंदर गदिमांच्या नव्वद कथांपैकी सव्विस ग्रामिण कथा दिसून येतात.

**गदिमांच्या ग्रामिण कथेतील माणदेशचा परीसर**

ग.दि.माडगूळकरांचे ‘ माडगूळ ’ गाव जुण्या आटपाडी संस्थानात होते. आता आटपाडी तालुक्याचे ठिकाण आहे. हा आटपाडी तालुका सांगली जिल्हयात येतो. या परीसरात कोरेगाव , खटाव , माण आणि आटपाडी हे तालुक्याचे ठिकाण आहेत.यालाच माणदेश म्हणतात. गदिमांचे संपुर्ण बालपण हया माणदेशच्या परिसरात गेले. त्यामुळे तिथले संस्कार त्यांच्या बालमनावर झाले . त्यामुळेच माणदेशातला निसर्ग, माणदेशातला परीसर तिथले माणसे तिथल्या रूढी , परंपरा, श्रद्वा, समजुती, माणसांची सखदु:खे, त्यांची सोषिकता , तिथले स्त्रीजीवन, घटना, प्रसंग हयांचे वर्णन त्यांच्या कथांमधुन कथानकाद्वारे व्यक्त झाले आहे.

माणदेशाच्या जिवन रसातुनच गदिमांच्या ग्रामीण कथेचा पिंड घडलेला आहे. माणदेशातील भाषा व घटना प्रसंगांनी त्यांची कथा नटलेली आहे. संपुर्ण मणदेशाचा परिसर त्यांचे अनुभव विस्व राहिल्याने त्यांच्या कथाना माणदेशी प्रादेशीकतेचा रंग , गंध लाभलेला आहे.माणदेशातील स्वत: बघीतलेल्या स्त्री. पुरूषांच्या व्यक्तिरेखा गदिमांनी रसरसीतपणे कथेतुन अभिव्यक्त केल्या आहेत.

माणदेशातील उन्हाळा , पावसाळा ,पाण्याचे दुर्भिष्य, रखरखते उन्ह , बाभळी, निंबाचे वृक्ष, तिथला हिवाळा, तिथली पिके, बोराटी , निवडुंगाचे झुडपे, दरवेशी,गारूडी,भटके लोक , बाराबलुतेदार , शिपी, कुंभार , चांभार , न्हावी , लोहार हयांचे वर्णन त्यानी त्यांच्या ग्राणीण कथांमधुन केलेले आहे.

**ग.दि.माडगुळकरांच्या ग्रामीण कथांचे स्वरूप :-**

गदिमांची पहिलीच ‘ विज’ ही अस्सल ग्रामीण कथा आहे. उरापोटावर आवाळे वाढलेला कुरूप तुकाराम इथे दिसतो . त्याचे मुर्तीमंत दु:खे इथे प्रकटले आहे. मुके प्रेम मधील मुका भोळया स्वभावाचा रोहिदास चांभार, ‘सघ्या हेकणे’ ‘ मावशी परत आल्या पण’ मधील सात्वीक मावशी व वेडी सोनी , ‘वय’ या कथेतील रामा चौगुला, ‘गौडबंगाल’ मधील तुकाराम पाटील ‘ आसक्ती ’ मधील जनाई ही सारी सुखदु:खे भोगणारी पात्रे व त्याच्या द्वारे घडणा-या घटना गदिमांनी रेखाटल्या आहेत .

निर्वाण हया कथेतिल बाव-या जुण्यामुल्यांची जपणुक करतो. तर ‘ मंत्राचे पत्र ’ मधील पांडा मांस्तर हजरजबाबी पणे स्वत:वरील संकटे परतवुन लावतो . वसुली ’ मधील दादागडबोल्या हिकमतीने पैसे वसुल करतो . कृष्णाची करंगळी मधील कृष्णराव तात्या गावासाठी स्वत:ची करंगळी जाळुन घेतो. माणुस अखेर माणुस मधील म्हातारी मथुकाकी, ‘भुक’ या कथेतील म्हातारा सुस्वभावी ज्ञानु पाटील . ‘ भातांचे ‘फुल’ मधील नाजुक कांचन ही सारी पात्रे सुखदु:खाला सामोरे जातात. कोणत्या ना कोणत्या कारणाने दु:खी होतात. परिस्थीतीमुळे शोक त्यांच्या वाटयाला येतो. मात्र गदिमांनी या कथानायकांचे जीवणदर्शन प्रचंडक्षमतेने घडविले आहे. अनेक अस्पर्शी विषय कथाविषय म्हणुन दृष्टीस पडतात. उपरोक्त कथा वाचकांना आकर्षित करणा-या कथा आहेत.

**समारोप :-**

गदिमांच्या ग्रामीण कथेचे अवलोकन केले असता. त्यात प्रयोगशिलता , उत्कृष्ट निवेदन, ग्रामीण भाषेतील संवाद , साधी सोपी , सरळ भाषा शैली वस्तुनिष्ठ , वास्तवदर्शी व्यक्तिरेखाटन हयामुळे ही कथा वैशिष्टयपुर्ण ठरली आहें सोबतच मौल्यवान जिवनदर्शन व समाजदर्शन, मानवी भाव भावनांचे विलंक्षण संयत व

सुचक आविष्कारण. रस - रंग - गंधाने व्यापलेला निसर्ग आणि कथेचे पुर्वपरंपरेशी असलेले नाते, कलात्मकलेने साकारणारी कथा. कथेचे निवेदन प्रमाण मराठी भाषेत तर संवाद माणदेशी भाषेत. संदर्भ वहुलता, उत्कृष्ठ प्रतीक , प्रतिमा, सुचकता, ही सारी वैशिष्टय दृष्टीस पडतात. त्यामुळे गदिमांची ग्रामिण कथा वाचनिय व अभ्यासनिय ठरते

## संदर्भ ग्रंथसुची :-

१ इंदुमती शेवडे :- ‘ मराठी कथा उगम आणि विकास’ सौमैया पब्लीकेशन्य ,मुबई, प्र.आ. १९७३

२ अंबादास माडगुळकर :-‘मराठी ग्रामीण कथा’ श्री लेखन सुर्यकांत खांडेकर वाचन भंडार पुणे प्रथम आ. १९६७

३ ग.दि.माडगुळकर :- ‘ लपलेला ओघ’ कूलकर्णी ग्रंथागार , पुणे प्रथम आ. १९५२

४ ग.दि. माडगुळकर :- ‘ वेग आणि इतर कथा’ कुलकर्णी ग्रथागार पुणे प्रथम. आ .१९५७

५ ग.दि. माडगुळकर :- ‘बोलका शंख ’ , कुलकर्णी ग्रंथागार पुणे प्रथम. आ. १९६०

६ ग.दि. माडगुळकर :- ‘कृष्णाची करंगळी’कुलकर्णी ग्रथागार पुणे प्रथम.आ.१९६२.

७ ग.दि. माडगुळकर :- बांधावरच्या बाभळी , कुलकर्णी ग्रंथागार पुणे प्रथम आ. १९६३

८ ग.दि. माडगुळकर :- चंदनी उदबंती .कुलकर्णी ग्रंथागार पुणे प्रथम आ. १९६७

९ ग.दि. माडगुळकर :- भाताचे फुल कुलकर्णी ग्रंथागार पुणे प्रथम आ. १९७१

१० ग.दि. माडगुळकर :- सोने अणि माती कुलकर्णी ग्रंथागार पुणे प्रथम आ. १९७३